महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २१ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### यंदाचे अर्थ अधिवेशन भावना, राजकारण आणि पैशांचे गणित

महाराष्ट्र विधिमंडळाचे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन हे केवळ नियमित संसदीय कामकाजापुरते मर्यादित राहणार नाही, तर ते राज्याच्या राजकीय आणि आर्थिक दिशादर्शक ठरण्याची चिन्हे आहेत. एका बाजूला वाढता कर्जाचा डोंगर, वित्तीय शिस्तीचे आव्हान आणि येणाऱ्या निवडणुकांची पार्श्वभूमी आहे; तर दुसऱ्या बाजूला माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अचानक निधनामुळे निर्माण झालेली राजकीय पोकळी आणि भावनिक वातावरण आहे. अधिवेशनाची सुरुवात शोकप्रस्तावाने होत असली, तरी या मृत्यूभोवती उपस्थित झालेले प्रश्न सरकारला दुर्लक्षित करता येणार नाहीत. पारदर्शक चौकशीची मागणी केवळ राजकीय नाही, तर लोकशाही मूल्यांची कसोटी आहे. विरोधकांनी उपस्थित केलेले प्रश्न हे सत्ताधाऱ्यांसाठी अस्वस्थ करणारे असले, तरी त्यांची उत्तरे देणे हीच परिपक्व राजकारणाची खूण ठरेल. या अधिवेशनातील सर्वात निर्णायक टप्पा म्हणजे अर्थसंकल्प.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सादर होणारा हा अर्थसंकल्प आकड्यांपुरता न राहता, राज्याच्या आर्थिक वास्तवाचे प्रतिबिंब असणे गरजेचे आहे. जवळपास ९ लाख कोटींहून अधिक कर्जाचा बोजा असलेल्या महाराष्ट्रासाठी "१ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था" हे स्वप्न आकर्षक असले, तरी त्यासाठी ठोस नियोजन, खर्चावर नियंत्रण आणि महसूलवाढीचे स्पष्ट मार्ग आवश्यक आहेत. भावनिक वातावरण, राजकीय दबाव आणि निवडणूक गणित यांपलीकडे जाऊन सरकार आर्थिक शिस्त आणि पारदर्शकतेला प्राधान्य देते का, यावर या अधिवेशनाचे मूल्यमापन होईल. विधिमंडळ हे केवळ आरोप-प्रत्यारोपांचे व्यासपीठ न राहता, उत्तरदायित्व आणि दूरदृष्टी दाखवते का—हा खरा प्रश्न या अधिवेशनाने महाराष्ट्रासमोर उभा केला आहे.

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदेंच्या प्रयत्नांना यश

# कल्याण–तळोजा मेट्रो विस्ताराला अखेर मंजुरी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २०**

**कल्याण : कल्याण लोकसभा मतदारसंघाला मुंबई व नवी मुंबईशी थेट जोडणाऱ्या मेट्रो १२ प्रकल्पाच्या विस्तारीकरणाची महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मेट्रो १२ अ या नव्या विस्तारित मार्गास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.**

या नव्या मेट्रो मार्गिकेमुळे कल्याण–शिळफाटा रस्त्याच्या समांतर मेट्रो उभारण्यात येणार असून कल्याण फाटा, दहिसार मोरी मार्गे तळोजा मेट्रो स्थानकापर्यंत थेट प्रवास शक्य होणार आहे. त्यामुळे शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ८ हजार ४१४.५३ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून विस्तारित मार्गाची एकूण लांबी अंदाजे १८.४ किलोमीटर असणार आहे. या मार्गावर एकूण १२ उन्नत मेट्रो स्थानके प्रस्तावित असून मानपाडा, काटई नाका, देसाई नाका, कल्याण फाटा, दहिसार मोरी, खुतारी गाव आदी भागांना थेट मेट्रो सेवा मिळणार आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सांगितले की, या विस्तारीकरणामुळे कल्याण–डोंबिवली, मानपाडा, शिळफाटा परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यात मेट्रो १४ सोबत एकत्रीकरण झाल्यानंतर नवी मुंबई व मुंबईकडे प्रवास अधिक सुलभ होणार आहे. हा प्रकल्प कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या दळणवळण विकासाला नवी दिशा देणारा ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

- **कल्याण–शिळफाटा मार्गावर नवीन मेट्रो लाईन**
- **तळोजा मेट्रोशी थेट जोडणी**
- **शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक कोंडीला दिलासा**
- **एकूण १२ उन्नत मेट्रो स्थानके**
- **प्रकल्प खर्च सुमारे ८ हजार ४१४.५३ कोटी**
- **एकूण अंदाजे १८.४ किलोमीटर लांबीचा विस्तारित मेट्रो मार्ग**

## मुस्लिम आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २०**

**मुंबई :** मुस्लिम समुदायासाठी असलेले ५ टक्के आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने महाराष्ट्र सरकारभोवती नवा कायदेशीर व राजकीय वाद निर्माण झाला आहे. राज्य सरकारने १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सरकारी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमधील हा कोटा रद्द करणारा शासन निर्णय जारी केला असून, त्याला मुंबई उच्च न्यायालय येथे आव्हान देण्यात आले

**महाराष्ट्र सरकारने मुस्लिम समुदायासाठी असलेले ५ टक्के आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयामुळे नव्या कायदेशीर लढ्याला सुरुवात झाली असून, आरक्षणाच्या धोरणावरून पुन्हा एकदा राज्याचे राजकारण तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत**

आहे. याचिकेत हा निर्णय असंवैधानिक व सांप्रदायिक हेतूने प्रेरित असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा निर्णय लोकशाही मूल्यांच्या विरोधात असून एका मोठ्या समुदायाला विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ढकलणारा असल्याचा युक्तिवाद करण्यात आला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे २०१४ मध्ये तत्कालीन काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस सरकारने 'विशेष मागासवर्ग' श्रेणीतून मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिम समुदायाला ५ टक्के आरक्षण दिले होते. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेत मराठा आरक्षण रद्द झाले, मात्र मुस्लिम आरक्षण शैक्षणिक संस्थांपुरते अंशतः कायम राहिले होते. सध्याच्या निर्णयामुळे हा जुना वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## शून्य टक्के भूसंपादन !

### सात वर्षांपासून कल्याण–मुरबाड रेल्वे कागदावरच !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ●प्रतिनिधी / दि. २०**

**मुंबई :** कल्याण–मुरबाड दरम्यान वेगवान रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी मंजूर करण्यात आलेला नवीन रेल्वे मार्गिका प्रकल्प गेली सात वर्षे भूसंपादनाच्या अडथळ्यात अडकून पडला आहे. प्रकल्पासाठी अद्याप एक टक्काही भूसंपादन न झाल्याने हा मार्ग कधी पूर्ण होणार, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. हा प्रकल्प २०१८–१९ मध्ये मंजूर झाला असून सुमारे २८ किलोमीटर लांबीच्या या मार्गावर ७ रेल्वे स्थानके प्रस्तावित आहेत. प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे ८३६.१२ कोटी रुपये आहे. मात्र भूसंपादन प्रक्रिया रखडल्यामुळे ठरवलेले वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. या मार्गिकेसाठी एकूण २०८.०९ हेक्टर जमिनीची आवश्यकता असून त्यापैकी १७४.५८ हेक्टर खासगी, २४.०७ हेक्टर वनजमीन तर केवळ ९.४४ हेक्टर सरकारी जमीन आहे. भूसंपादनाचे प्रस्ताव राज्य शासनाकडे विविध टप्प्यांत सादर करण्यात आले असले तरी प्रत्यक्ष कामाला गती मिळालेली नाही. मध्य रेल्वे आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात ५०–५० टक्के खर्च वाटपाच्या कराराअंतर्गत हा प्रकल्प राबवला जाणार आहे.




## थोडक्यात महत्त्वाचे

### ११ वर्षांनंतर टीएमटी भाडेवाढीच्या मार्गावर ?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २०**

**ठाणे :** वाढती महागाई, इंधनदरातील चढ-उतार आणि आस्थापना खर्चात झालेली मोठी वाढ यामुळे ठाणे महानगरपालिका परिवहन सेवा गंभीर आर्थिक संकटात सापडली आहे. या तोट्यातून मार्ग काढण्यासाठी प्रशासनाने तब्बल ११ वर्षांनंतर बस भाडेवाढीचा पर्याय गांभीर्याने विचारात घेतला असून, त्यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. ठाणे परिवहन सेवेचे वार्षिक उत्पन्न सध्या साधारण ९० ते ९५ कोटी रुपयांच्या दरम्यान आहे, तर बस सेवा चालवण्याचा एकूण वार्षिक खर्च तब्बल ३५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. यामध्ये आस्थापना खर्च १५० कोटी, बस परिचालन १०० कोटी, ई-बस प्रकल्पासाठी ५० कोटी तसेच इंधन, वीज आणि देखभाल-दुरुस्तीचा मोठा खर्च समाविष्ट आहे. महागाईसोबतच मनुष्यबळावरील खर्च वाढत असताना, जुन्या भाडेदरांमध्ये दर्जेदार आणि नियमित सेवा देणे कठीण झाल्याचे प्रशासकीय सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रवासी सेवेचे अस्तित्व टिकवण्यासाठी भाडेवाढ अपरिहार्य असल्याचा सूर उमटत आहे.

### अंबाडी : लाचखोरी प्रकरणी ग्रामपंचायत सदस्य एसीबीच्या जाळ्यात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २०**

भिवंडी तालुक्यातील अंबाडी परिसरात अनधिकृत बांधकामाचा अर्ज मागे घेण्यासाठी लाच मागितल्याप्रकरणी ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील पाटील (वय ३५) याला ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. तक्रारदाराने बांधलेल्या तळ अधिक तीन मजली इमारतीस सीसी व ओसी मंजूर असतानाही घरपट्टी व पाणीपट्टी आकारणीस विरोध करून ती इमारत अनधिकृत असल्याचा आरोप करण्यात आला होता. हा अर्ज मागे घेण्यासाठी स्वप्नील पाटील याने तक्रारदाराकडे १ लाख ७० हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतल्यानंतर पडताळणी करून १८ फेब्रुवारी रोजी सापळा रचण्यात आला आणि लाच स्वीकारताना स्वप्नील पाटील याला पकडण्यात आले.

## भिवंडी-निजामपूर महापालिका महापौरपदी नारायण चौधरी !

### उपमहापौरपदी तारीक मोमीन विजयी

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका म्हणजे सत्तासंघर्ष, अंतर्गत कुरघोडी आणि राजकीय डावपेचांचे केंद्रबिंदू. येथे महापौरपदाची निवडणूक ही केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता, प्रत्येकवेळी पक्षांच्या शक्तिपरीक्षेचे रणांगण ठरते. यंदाच्या निवडणुकीतही राजकीय नाट्य, अनपेक्षित युती, फुटलेली मते आणि मागील दाराने झालेले समझोते यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष भिवंडीवर केंद्रीत झाले होते. पक्षीय शिस्त, निष्ठा आणि आघाड्यांची विश्वासार्हता या सर्व कसोट्यांवर ही निवडणूक तगडी ठरली असून, निकालाने अनेक राजकीय दावे हवेत विरले.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता भिवंडी (प्रतिनिधी)**

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुका अटीतटीच्या व अनपेक्षित राजकीय समीकरणांतून पार पडल्या. महापौरपदी नारायण चौधरी यांची निवड झाली, तर उपमहापौरपदी तारीक मोमीन यांनी विजय मिळवला.



महापौरपदासाठी झालेल्या मतदानात नारायण चौधरी यांना ४८ मते मिळाली. त्यांनी शिवसेना कोनार्क विकास आघाडीचे विलास पाटील आणि भाजपच्या स्नेहा मेहुल पाटील यांचा पराभव केला. या निवडणुकीत भाजपच्या ६ नगरसेवकांनी चौधरी यांना मतदान केल्याने निकाल निर्णायक ठरला आणि सत्तासमीकरणांना वेगळी दिशा मिळाली. उपमहापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेस सेक्युलर फ्रंटचे तारीक मोमीन यांनी ४३ मते मिळवत विजय संपादन केला. त्यांनी शिवसेना व भिवंडी विकास आघाडी तसेच भाजपच्या उमेदवारांचा पराभव केला. या निकालामुळे महापालिकेतील राजकीय आघाड्यांमध्ये अनपेक्षित उलथापालथ झाल्याचे चित्र स्पष्ट झाले. ही संपूर्ण निवडणूक भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मुख्य सभागृहात ठाणे जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. निवडणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. निकाल जाहीर होताच समर्थकांनी जल्लोष करत नवनिर्वाचित महापौर व उपमहापौरांचे अभिनंदन केले. या निवडणुकीने भिवंडी निजामपूर महानगरपालिकेतील आगामी राजकीय दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा गाठल्याचे स्पष्ट झाले आहे.

## मराठा महोत्सवातून छत्रपती शिवरायांच्या विचारांचा जागर

### अंबरनाथ तालुक्यात मराठा महोत्सवाचा जल्लोष



**"छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार, त्याग आणि शौर्य आजच्या समाजासाठी दिशादर्शक आहेत. मराठा महोत्सवाच्या माध्यमातून शिवविचारांची जपणूक होत असून समाजात एकजुटीचा संदेश जात आहे. युवकांनी शिवरायांच्या स्वराज्य, न्यायनीती व राष्ट्रनिष्ठेचा वारसा आत्मसात करावा. अशा उपक्रमांतून सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक जाणीव अधिक बळकट होते."**

**● आमदार किसन कथोरे**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २०**

**अंबरनाथ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अंबरनाथ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य मराठा महोत्सव उत्साहात व जल्लोषात पार पडला. या महोत्सवाचे उद्घाटन राजसाहेब अक्कलकोट संस्थानाचे श्रीमंत छत्रपती मालोजीराजे संयुक्ताराजे भोसले आणि आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपण्याचे तसेच समाजहितासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. शिवरायांचे स्वराज्य, शौर्य, न्यायनीती आणि सर्वसमावेशक राज्यकारभार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

महोत्सवाच्या निमित्ताने छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमी जीवनावर आधारित "शिवशंभू शौर्यगाथा" या भव्य महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते. या महानाट्यातून संभाजी महाराजांचे अद्वितीय शौर्य, धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा प्रभावीपणे सादर करण्यात आली. उपस्थितांनी या महानाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमास विविध मान्यवर, समाजबांधव, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रेरणेने समाजाने एकजुटीने पुढे जावे, अशी अपेक्षा व्यक्त करत सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.





# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय 396 व्या शिवजयंतीचा दिमाखदार सोहळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवजयंती उत्सव २०२६' अत्यंत उत्साहात आणि भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्यात आला. "निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू" या उक्तीप्रमाणे महाराजांच्या आदर्श प्रशासकीय आणि शौर्यशाली वारशाचे स्मरण या निमित्ताने करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या उपस्थितीत सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि शिवगर्जना देऊन महोत्सवाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेली भव्य पदयात्रा सकाळी ८:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून निघाली. केंद्र सरकारच्या 'माय भारत, मेरा युवा भारत' या उपक्रमांतर्गत आयोजित या पदयात्रेतून शिवरायांनी दाखवून दिलेल्या सुशासन आणि राष्ट्रनिर्माणाच्या आदर्शांचा जागर करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात आणि भगव्या ध्वजांच्या उपस्थितीत ही रथयात्रा ठाणे शहरातून मार्गक्रमण करीत पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचली. यादरम्यान तलाव पाळी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील यांनी पुष्पहार अर्पण केला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने नियोजन भवन प्रांगणात 'अश्वमेध प्रतिष्ठान इंटक ठाणे चॅप्टर' यांच्या सौजन्याने शिवकालीन शस्त्रास्त्रांचे आणि वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या प्रदर्शनातील प्रत्येक वस्तूची बारकाईने माहिती घेतली आणि या ऐतिहासिक ठेव्याचे जतन केल्याबद्दल अश्वमेध प्रतिष्ठानचे कौतुक केले. या प्रदर्शनामुळे उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांना प्रत्यक्ष शिवकालीन युद्धनीती आणि साहित्याचा अनुभव घेता आला.

नियोजन भवन येथे पार पडलेल्या मुख्य सांस्कृतिक सोहळ्यात 'शिव शंभू गाथा' या टीमने आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या सादरीकरणाने उपस्थितांना इतिहासात नेले. पोवाडे, गोंधळ, जागरण आणि विविध शौर्यगीतांच्या माध्यमातून शिवरायांच्या जीवनपटातील महत्त्वाचे प्रसंग जिवंत करण्यात आले. सादरीकरणातील जिवंतपणा पाहून उपस्थित अधिकारी आणि नागरिक भारावून गेले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नसून ते एक उत्तम व्यवस्थापक आणि रयतेचे राजे होते. आज आपण शॉर्ट नोटीसवर आणि काशिनाथ घाणेकर नाट्यगृहाचे नूतनीकरण सुरू असतानाही नियोजन हॉलमध्ये इतका सुंदर कार्यक्रम करू शकलो, हे टीम वर्कचे यश आहे. शाहीर आणि कलाकारांनी मांडलेला अफजलखान वध आणि शाहिस्तेखानाची फजिती हे प्रसंग बघताना जुन्या आठवणी ताज्या झाल्या."

या प्रेरणादायी सोहळ्यासाठी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव म्हस्के पाटील, शशिकांत गायकवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर व उर्मिला पाटील, पोलीस उपआयुक्त (वाहतूक विभाग) पंकज शिरसाठ, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले, तहसिलदार सचिन चौधर, रेवण लेंभे, संदीप थोरात, उमेश पाटील, अमोल कदम, प्रदीप कुडाळ, नायब तहसिलदार दत्तात्रय बेर्डे, तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव, लेखाधिकारी उमेश कुमावत, जिल्हाधिकारी महोदयांचे स्वीय सहायक गिरीश काळे, सागर यादव तसेच इतर प्रशासकीय अधिकाऱ्यांसह भारत स्काऊट, गाईड, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी चे विद्यार्थी, विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, पोलीस दल आणि ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवरायांना अभिवादन केले.

कार्यक्रमाची सांगता शिवगर्जना आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने करण्यात आली.

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना केडीएमसीतर्फे अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आद्य पत्रकार, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांचा जयंती दिन महापालिकेत संपन्न झाला. महापालिका मुख्यालयात महापौर हर्षाली विजय चौधरी यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपस्थित शिवसेना गटनेते विश्वनाथ राणे, भाजपा गटनेते शशिकांत कांबळे, मनसे गटनेते प्रल्हाद म्हात्रे, महापालिका सचिव किशोर शेळके, उपआयुक्त वंदना गुळवे, समीर भुमकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे यांनी देखील बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

# शिवजयंती निमित्त वार्षिक स्नेहसंमेलन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा** : मांगरूळ ग्रामपंचायतीच्या हद्दीत येणारी जिल्हा परिषद शाळा फणसपाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी दरवर्षी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे कल्पेश ठाणगे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज आणि सावित्री माईंच्या प्रतिमापूजनाने करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमामध्ये शाळेतील आणि गावातील विद्यार्थ्यांनी माँसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर आदी थोर महापुरुषांच्या गाण्यांवर नृत्य, प्रबोधनपर नृत्य सादर केले. काही मुलांनी लोकगीते, कोळीगीते तर काहींनी भाषणे केली. शाळेचे आजी माजी शिक्षक आणि गावकऱ्यांच्या सहभागातून ह्या सुंदरशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ह्यावेळी गावचे सरपंच चंद्रकांत दुधवडे, उपसरपंच कल्पेश लोटे, कांबळे सर, जमादार सर, लाखात सर, म्हसरे सर, माढे सर ह्यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक किरण पवार आणि सूरज राऊत यांनी केले तर गटशिक्षणाधिकारी सातपुते साहेब, विस्तार अधिकारी सुतार मॅडम आणि केंद्रप्रमुख ढवळे सर ह्यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. हयावेळी निवृत्त विस्तार अधिकारी विष्णू लोटे आणि निवृत्त शिक्षक संजय माढे ह्यांचा ग्रामस्थ्यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

# स्वराज्य मित्र मंडळातर्फे शिवजन्मोत्सव साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील स्वराज्य मित्र मंडळातर्फे गुरुवारी "शिवजन्मोत्सव" साजरा करण्यात आला. यंदाचे १० वर्षे असल्याने संपूर्ण आठवड्याभर खजिना शोध, बांदल सेना आणि बाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदानाची शौर्यगाथा सांगणारा "पावनखिंड' देखावा, भजन-किर्तन अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

१८ तारखेच्या रात्री १२ वाजल्यानंतर फटाक्यांची रोषणाई करून शिव-गारद देण्यात आली. सकाळी किल्ले दुर्गाडी येथे मशाल प्रज्वलन करून निळकंठ पार्क गृहसंकुल पर्यंत मशाल दौड चे आयोजन केले. या कार्यक्रमात माजी नगरसेवक तथा शिवसेना उपशहरप्रमुख सुनिल वायले यांची उपस्थिती लाभली. तद्नंतर समस्त महिला वर्गाने बाळ-शिवाजी महाराजांचा प्रतिकात्मक स्वःरूप तथा पाळणा-गीत गाऊन जन्मोत्सव



साजरा केला. कार्यक्रमादरम्यान डॉ. तनुजा वायले आणि प्रमिला पाटील, किरण भांगले या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सहभाग लाभला. सायंकाळी ४ वाजता शोभा यात्रेचे नियोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने गृहसंकुलातील मुला-मुलींनी राज्याभिषेक सादरीकरण केले. काही महिला वर्गाने देवींचे स्वरूप साकारले तसेच अन्य महिला, युवतीं आणि लहान मुलींनी लेझिम खेळत भारतीय संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न केला. लहान मुले तथा युवक- युवतींनी शिवकालीन मर्दानी खेळ लाठी-काठी, दांडपट्टा, ढाल-तलवार, बाणाकाटा, उरुमी लवचिक, चाबकासारखी पाती असलेली भारतीय तलवार आहे. केरळ राज्यात कंबरेभोवती गुप्तपणे घातली जाते. अन्य साहसी खेळाचे प्रात्यक्षिक करून दाखवले, सामर्थ्य ढोल-ताशा पथक डोंबिवली यांचे स्थिर वादन झाले.

स्वराज्य मित्र मंडळ युवक-युवतींनी आजच्या युगातील लुप्त होत चाललेली भारतीय संस्कृती आणि साहसी खेळाचे महत्व अधोरेखित केले. या कार्यक्रमात केडीएमसीच्या नवनिर्वाचित महापौर हर्षाली चौधरी, माजी आमदार नरेंद्र पवार, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, नगरसेवक तथा नगरसेविका शालिनी वायले, शामल गायकर, उल्हास भोईर, रवी गायकर, कावेरी देसाई, कल्पेश देसाई आदी समाजसेवकांची प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शनपर उपस्थिती लाभली.

# संस्थेला दंड विद्यार्थ्यांवर परिणाम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मुंबई विद्यापीठाने कासारवडवली येथील ज्ञानगंगा शिक्षण संस्थेला विलंबित प्रवेशाच्या कारणावरून आकारलेला लाखो रुपयांचा दंड डिग्री कॉलेजने २७ विद्यार्थ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला. यामुळे विद्यार्थ्यांनी आ. संजय केळकर यांच्याकडे धाव घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.

जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून त्यांची व्यथा मांडली. विद्यापीठाच्या नियमानुसार २१ ते ४० विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणांमध्ये त्रुटी आढळल्यास महाविद्यालयास दहा लाख रुपये दंड अधिक प्रती विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या दुप्पट रकमेची दंडात्मक आकारणी करण्यात यावी. याबाबतचे पत्र विद्यापीठाने ज्ञानगंगा शिक्षण संस्थेस पाठवले आहे. मात्र, संस्थेने हा दंड विद्यार्थ्यांच्या माथी मारला.

# दहिवली येथे युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचा शिवसंस्कार जयंती महोत्सव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील दहिवली गावात युवा संस्कार बहुउद्देशीय संस्था, दहिवली यांच्या वतीने शिवसंस्कार जयंती महोत्सव व संस्थेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमातून भारतीय संस्कृती, परंपरा, संस्कार व राष्ट्रप्रेमाचा जागर करण्यात आला.

या महोत्सवानिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी "आपल्या घरासमोर सुलभ रांगोळी" या विषयावर रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत पालखी सोहळ्यात सहभागी होत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली असून पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, राष्ट्रनिर्मिती, विविधतेत एकता व संविधानातील मूल्ये या विषयांवर प्रभावी चित्रे साकारण्यात आली.

महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ तसेच 'होम मिनिस्टर' या खेळांचे आयोजन करण्यात आले. विजेत्या व सहभागी महिलांना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात वर्षभर प्रामाणिकपणे व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात 'संगीत शिवचरित्र' अंतर्गत शिवव्याख्यान व पोवाड्यांचे सादरीकरण करण्यात आले. अनिकेत दांडेकर व युवा संस्कार संस्थेच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले. स्टँड-अप कॉमेडियन उमेश उघडे व दिनेश सासे यांनी विनोदी सादरीकरणातून उपस्थितांना खळखळून हसवले. गड-किल्ले संवर्धनाविषयी माहितीपर सादरीकरण हर्षल कांबरी यांनी करून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान व जाणीव निर्माण केली.

# जीवनदीप महाविद्यालयात शिवजयंतीनिमित्त शस्त्रकला व काव्यस्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली(प्रशांत घोडविंदे)** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तसेच ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त गोवेली येथील जीवनदीप महाविद्यालयात विविध सांस्कृतिक व साहसी उपक्रमांचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंदे यांच्या



हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शिवकालीन शस्त्रकला व साहसी खेळांचे थरारक सादरीकरण करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी बबलू केने व त्यांच्या सहकाऱ्यांनी लाठी-काठी, तलवारबाजी आणि दांडपट्टा यांसारख्या पारंपरिक शस्त्रकलेचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना शिवकालीन पराक्रमाची जाणीव करून दिली. यानंतर कविता वाचन व गायन स्पर्धा पार पडली. विद्यार्थ्यांनी स्वलिखित कविता, पोवाडे आणि मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेचे गुणगान करणारी गीते सादर केली. स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सादरीकरणातील आत्मविश्वास विशेष लक्षवेधी ठरला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सतीश लकडे , इतिहास विभाग प्रमुख.प्रा. कविता काटकर,प्रा. माधवी माळवे तसेच प्राध्यापकवृंद, विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य व उपप्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत मराठी भाषा व संस्कृती जपण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रम हा मराठी विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी दिया झाटे हिने प्रभावीपणे केले. प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# ठाणे ग्रामीण पोलिस शिपाई भरतीला सुरुवात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे ग्रामीण पोलिस दल अंतर्गत पोलिस शिपाई भरती प्रक्रियेला वेग आला आहे. पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी, शारीरिक तपासणी व मैदानी चाचणी २१ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. प्रक्रिया दररोज सकाळी साडेचारपासून सुरू होणार आहे. ठाणे ग्रामीण पोलिस दलातील १६७रिक्त पदांसाठी सुमारे ४,७०० उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज केले असून, एका पदासाठी सरासरी २८ उमेदवारांत चुरस पाहायला मिळणार आहे. भरती प्रक्रिया ठाण्यातील मुंब्रा-कौसा परिसरातील मौलाना अबुल कलाम आझाद टीएमसी स्टेडियम (टीएमसी हॉस्पिटलजवळ), एमएम व्हॅली येथील टीएमसी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि जिलानी पार्क रोड परिसरात होणार आहे. उमेदवारांनी ऑनलाइन अर्जाची प्रत, प्रवेशपत्राच्या दोन प्रती, सहा पासपोर्ट साइज रंगीत फोटो, आधार कार्ड, इयत्ता बारावीचे गुणपत्रक व बोर्ड प्रमाणपत्र (किंवा समकक्ष) तसेच उच्च शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे सोबत आणावीत.

# महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा पहिला टप्पा राज्यात सुरु

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्यातील सामान्य जनता, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी आणि तक्रारी सत्वर निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा १)' राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान व्हावे, या उद्देशाने प्रत्येक जिल्हयातील तालुक्यातील मंडळ स्तरावर या शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत पूर्व तयारी करण्यात येणार असून, प्रत्यक्ष शिबिरांची सुरुवात ७ मार्चपासून होणार आहे. या विशेष मोहिमेद्वारे नागरिकांना एकाच दिवशी सेवा (Single Day Service Delivery) पुरविण्यावर आणि महसूल संहितेतील नवीन तरतुदींची जनजागृती करण्यावर भर दिला जाणार आहे.

या अभियानाचे महत्त्व अधोरेखित करताना रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने यांनी समस्त ठाणेकरांना या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. अभियानाच्या वेळापत्रकानुसार, मार्च महिन्यात ७ आणि १४ तारखेला मंडळ स्तरावर शिबिरे होतील. त्यानंतर एप्रिल महिन्यात १० आणि १७ तारखेला पुन्हा मंडळ स्तरावर आयोजन करण्यात येईल, तर मे महिन्यात ८ आणि १५ तारखेला नगर परिषद व नगर पंचायत स्तरावर ही शिबिरे घेतली जातील. या शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती करण्यासाठी विशेष हेल्प डेस्क उपलब्ध करून देणे आणि उत्पन्न, अधिवास व जातीच्या दाखल्यांचे वाटप करणे अशा महत्त्वाच्या सेवा पुरविल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, अकृषिक (NA) रूपांतरणासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नसून, विकास आराखडा मंजुरी हीच परवानगी समजली जाईल, यासारख्या नागरिकांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांसंबंधी बदलांची माहितीही या शिबिरात दिली जाणार आहे. याव्यतिरिक्त, जमिनीच्या तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा, एक वेळचे अधिमूल्य भरण्याची सोपी व्यवस्था आणि डिजिटल स्वाक्षरीयुक्त ७/१२ उताऱ्यांची कायदेशीर वैधता यांबाबत नागरिकांचे प्रबोधन केले जाईल. भूसंपादन झालेल्या जमिनींचे कमी-जास्त पत्रक तयार करून गाव दप्तर अद्ययावत करण्याची कार्यवाही देखील याच कालावधीत पूर्ण केली जाणार आहे. 'एक खिडकी योजना' राबवून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहतील आणि लोकांचे प्रश्न तातडीने सोडवतील, याची दक्षता घेण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत.

# भविष्यवेध



शनिवार

२१ फेब्रुवारी २०२६

### मेष
संपूर्ण लक्ष तुमच्या कामात सुधारणा करण्यावर असेल. मुले त्यांच्या पालकांकडे अधिक लक्ष देतील आणि त्यांचे ऐकतील. उधार घेतलेले पैसे परत मिळतील. व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे.

### वृषभ
आज तुम्ही काहीतरी नवीन सुरू करण्याचा विचार करू शकता. पण सुरुवात करण्यापूर्वी, तुमच्या वडिलांचा सल्ला घ्या. कौटुंबिक बाबींबाबत आजचे तुमचे निर्णय प्रभावी ठरतील.

### मिथुन
मित्र बनवण्याची आणि तुमचे विचार इतरांशी शेअर करण्याची काळजी घ्या, फक्त तुम्ही त्यांचे सखोल संशोधन करून आणि समजून घेतल्यानंतरच. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

### कर्क
तुमचे वडील तुमच्या व्यवसायात तुम्हाला पाठिंबा देतील. लोक तुमची प्रशंसा करतील, जे तुम्हाला नेहमीच ऐकायचे असते. नवविवाहित जोडप्यांना आज सहलीला जाण्याची संधी मिळेल.

### सिंह
तुमच्या विचारांना अर्थपूर्ण प्रयत्नांकडे वळवलं तर लोकांमध्ये तुमचा आदर वाढेल. आज तुम्हाला घरात काहीतरी दुरुस्त करावे लागू शकते. महिलांना घरातील कामातून आराम मिळेल.

### कन्या
आजची आर्थिक परिस्थिती चांगली असेल. संध्याकाळ तुमच्या भावंडांसोबत मजा करण्यात जाईल. तुमचा जोडीदार तुम्हाला एका लहान पाहुण्याच्या आगमनाची आनंदाची बातमी देऊ शकतो.

### तुळ
कामावर सहकारी आणि वरिष्ठ तुमच्या कामगिरीवर खूश होतील आणि तुमची प्रशंसा करतील. योग्य ते निकाल मिळतील. हवे असलेले मोठे ध्येय साध्य करण्याचा मार्ग तुम्हाला सापडेल.

### वृश्चिक
महत्वाची कामं पूर्ण करण्यासाठी वेळ सुज्ञपणे वापरा.सर्व महत्त्वाची कामे सहजपणे पूर्ण कराल. तुमच्या वडिलांनी तुम्हाला दिलेल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या तुम्ही सहजपणे पूर्ण कराल.

### धनु
मुलांना त्यांच्या करिअरबद्दल चांगली बातमी मिळेल. वडिलांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐका, कारण भविष्यात हे फायदेशीर ठरेल. तरुणांना चांगल्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता आहे.

### मकर
व्यवसायात प्रगतीच्या संधी निर्माण होतील. जर तुम्ही इलेक्ट्रॉनिक्स वस्तू खरेदी करण्याचा विचार करत असाल तर आजचा दिवस चांगला आहे. तुमच्या वैवाहिक जीवनात गोडवा राहील.

### कुंभ
पूर्वी केलेली छोटी कामे देखील सकारात्मक परिणाम देतील. यश, जरी लहान असले तरी, आनंद होईल. ऑफिसची कामे पूर्ण करताना लक्ष केंद्रित करा. तुमचे सहकारी तुमच्या कल्पनांनी प्रभावित होतील.

### मीन
तुम्ही इतरांच्या कामात हस्तक्षेप करणे टाळावे. तुमचे काम सोपे करण्याचा मार्ग तुम्हाला सापडेल. नवीन योजनेवर काम सुरू होऊ शकते. पैशांशी संबंधित चिंता कमी होतील. तुम्हाला आनंद मिळेल.

# कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला
कल्याण – शिळ रोड, कल्याण (प.) जि. ठाणे ४२१ ३०१
दूरध्वनी क्रमांक : (०२५१) २९० ३३११ e-mail : apmckalyan@rediffmail.com

## जाहीर नोटीस

कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण, मुख्य बाजार आवारातील विविध विभागातील गाळे/ओटे भाडेतत्त्वावर देण्यात आलेल्या गाळेधारकांच्या विनंती अर्जानुसार गाळे/ओटे वर्ग करण्यात येणार आहेत. तरी सदर गाळे/ओटे वर्ग करणे बाबत कोणतीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत समितीच्या कार्यालयात येऊन लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदरचे अर्ज मंजूर करून गाळे/ओटे वर्ग करण्यात येतील.

| अ.क्र. | गाळा/ओटे क्रमांक | मूळ गाळा/ओटे धारकाचे नाव | गाळा/ओटे ज्यांचे नाव वर्ग करण्यात येणार आहेत त्या इसमाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ए/बी/१९<br>१५० चौ.फुट | श्रीमती. रुक्मिणी रुस्तम येवले | शकील मोहम्मद झकेरिया शेख |
| २ | ए/बी/६७<br>९५ चौ.फुट | श्री. यशपाल देवधर बर्नवाल | व्यंकटेश मोतीराम पवार |
| ३ | ए/१०/२ | मे. कमल ऑइल डेपो (कांतिलाल शामजी हरिया) | बिलानो एक्सप्रेझो (प्रो. महेश रायचंद शाह) |
| ४ | फुलबाजार कॅन्टीन | सौ. रंजना खंडू फाफाळे | सौ. सुरेखा काशिनाथ नरवडे |
| | एम/११७<br>२३० चौ.फुट | मजहर मेहमुद बागवान | श्री. बाबाजी दगडू काळे व श्री. किरण बाळू काळे |

**जा.क्र. कृऊबास/जाप्रबा/३०७०/२०२६**
**दि. २०.०२.२०२६**

**जा.क्र. कृऊबास/जाहीर नोटीस/३०६९/२०२६**
**दि. २०.०२.२०२६**

**सही/- सही/-**
**सचिव सभापती**
**कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती**
**कल्याण,जि. ठाणे**

# गुरु तेगबहादुर साहिबजी शहिदी समागमासाठी समन्वयातून नियोजनाचे आवाहन – महापौर हर्षाली चौधरी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त संपन्न होणाऱ्या कार्यक्रमासाठी परस्परांशी समन्वय ठेवून, कार्यक्रमाचे व्यवस्थित नियोजन करावे, असे प्रतिपादन महापौर हर्षाली चौधरी यांनी आज केले. महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात विविध समुदायाच्या नागरीकांसमवेत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत बोलताना, त्यांनी हे प्रतिपादन केले.

सदर बैठकीत दि.28 फेब्रुवारी व दि.1 मार्च 2026 रोजी ओवे मैदान खारघर येथे हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या 350व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त संपन्न होणाऱ्या कार्यक्रमासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या विविध सुविधांबाबत चर्चा करण्यात आली.

महापालिकेने या कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी महापालिका क्षेत्रातील एकुण 19 ठिकाणी होर्डिंग्ज लावली आहेत, त्याचप्रमाणे हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या 350व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी महापालिकेचे 200 सफाई कामगार, 20 मुकादम, 10 स्वच्छता निरीक्षक आणि 2 स्वच्छता अधिकारी यांच्यामार्फत महापालिकेच्या सर्व प्रभागात सखोल स्वच्छता मोहिम सातत्याने सुरु असून, या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ महापालिका महापौर हर्षाली चौधरी व महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे उपस्थितीत करण्यात आला,महापालिकेच्या शाळांमध्येही हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांचेप्रती आदर भावना व्यक्त करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 29 शाळांतील 5,702 विद्यार्थ्यांनी शालेय परिसरात प्रभातफेऱ्या काढल्या, त्याचप्रमाणे 517 शाळांमधील एकुण 69,077 विद्यार्थ्यांनी वक्तृत्व, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये आपला सहभाग दर्शविला. त्याचप्रमाणे सुप्रसिध्द गायक सरताज सिंह यांनी गायलेले गीत महापालिकेच्या 556 शाळांमधून दाखविण्यात आले.हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या 350व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फतही 20 ठिकाणी आरोग्य शिबीरांचे आयोजन आतापर्यंत करण्यात आले असून, यामध्ये एकुण 2,389 रुग्णांवर औषधोपचार करण्यात आल्याची माहिती उपआयुक्त समीर भुमकर यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सिख समाजाच्या प्रतिनिधींनी या कार्यक्रमासाठी ,महापालिकेने भाविकांना कार्यक्रम स्थळी घेवून जाण्यासाठी वाहतुक व्यवस्था पुरवावी अशी मागणी केली असता, महापालिकेच्या परिवहन विभागामार्फत सदर व्यवस्था करुन त्याबाबतची माहिती दिली जाईल, असे आश्वासन संबंधितांना देण्यात आले.

यासमयी शिवसेना गटनेते विश्वनाथ राणे, भाजपा गटनेते शशिकांत कांबळे, मनसे गटनेते प्रल्हाद म्हात्रे, महापालिका सचिव किशोर शेळके, उपआयुक्त वंदना गुळवे, समीर भुमकर, कांचन गायकवाड, वैद्यकीय आरोग्य अधिकारी दीपा शुक्ल,समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, विविध समुदायांचे प्रतिनिधी, तसेच मान्यवर उपस्थित होते.

**Government of Maharashtra**
**Forest Department**
**Mangrove Division – North Konkan**

Abhimaan II, 5th Floor, Teen Haath Naka, Naupada, Thane (W)-400602
Email: dformissa@gmail.com
Parent Portal: http://mahatenders.gov.in

**E-Tender Notice**
**Tender Notice No. DFO/MDNK/61/A,C&D,E,F,DBLR,DBLR_Thane/2025-26.**

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division-North Konkan, Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602 from the bidders registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website http://mahatenders.gov.in from 19/02/2026 at 5.00 pm to 26/02/2026 at 5.00 pm. Blank Tender documents will not be sold by this office; interested bidders have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested bidders can contact on telephone no 022-69309286 during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website. If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: 1800 3070 2232.

| Sr. No. | Name of work | Estimated cost (Rs.) | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non-Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Survey, Demarcation and Execution of. Mangrove Tree Felling and Transportation Works for Diversion of 103.6554 Hectares of Forest (Mangrove) Land for the Proposed Versova to Bhayandar DP Road in the State of Maharashtra (FP/MH/Road/492832/2024) -Package A (Versova to Bangur Nagar) | 1,50,06,421/- | 1,50,000/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1180/- (Including GST) |
| 2 | Survey, Demarcation and Execution of Mangrove Tree Felling and Transportation Works for Diversion of 103.6554 Hectares of Forest (Mangrove) Land for the Proposed Versova to Bhayandar DP Road in the State of Maharashtra 2024) Package (FP/MH/ Road/492832/C&D (Mindspace -Malad to Charkop Creek). | 66,30,704/- | 66,307/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1180/- (Including GST) |
| 3 | Survey, Demarcation and Execution of Mangrove and Tree Felling Transportation Works for Diversion'of 103.6554 Hectares of Forest (Mangrove) Land for the Proposed Versova to Bhayandar DP Road in the State of Maharashtra (FP/MH/Road/492832/2024) Package DBLR (Construction of 45m wide elevated road from link road) | 1,60,77,854/- | 1,50,000/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1180/- (Including GST) |
| 4 | Survey, Demarcation and Execution of Mangrove Tree Felling and Transportation Works for Diversion of 103.6554 Hectares of Forest (Mangrove) Land for the Proposed Versova to Bhayandar DP Road in the State of Maharashtra (FP/MH/Road/492832/2024) -Package -DBLR (Versova Bhyander DP Road) | 1,90,58,881/- | 1,50,000/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1180/- (Including GST) |
| 5 | Survey, Demarcation and Execution of and Mangrove Tree Felling Transportation Works for Diversion, of 103.6554 Hectares of Forest (Mangrove) Land for the Proposed Versova to Bhayandar DP Road in the State of Maharashtra(FP/MH/Road/492832/2024 ) -Package-E (Charkop to Gorai) | 1,08,14,325/- | 1,08,143/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1180/- (Including GST) |
| 6 | Survey, Demarcation and Execution of Mangrove Tree Felling and Transportation Works for Diversion of 103.6554 Hectares of Forest (Mangrove) Land for the Proposed Versova to Bhayandar DP Road in the State of Maharashtra (FP/MH/ Road/492832/2024) -Package -F (Gorai to Dahisar) | 1,48,74,333/- | 1,48,743/- | 12 Months (Including Monsoon) | Rs. 1180/- (Including GST) |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.

2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

**sd /-**
**Divisional Forest Officer,**
**Mangrove Division-North Konkan**

**जावक क्रमांक : DGIPR-ROC-2025-26/क्र-5/C6070**

# बाळशास्त्री जांभेकर यांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी** : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे दि. 29-12-2025 च्या परिपत्रकान्वये आज दि. 20-02-2026 रोजी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर मजल्यावर मा. अति-आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

यांप्रसंगी, मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, मा. शहर अभियंता श्री. जमिल पटेल, सहा. आयुक्त (निवडणुक) श्री. नितीन पाटील, शहरविकास विभाग प्रमुख श्री. अरविंद घुगरे व अधिकारी / कर्मचारी वर्ग , तसेच पत्रकार वर्ग उपस्थित होता.

# डोंबिवलीतील पाणी पुरवठा तात्पुरता थांबणार

## दुरुस्ती कामांसाठी शटडाऊन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. २१**
**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली उदंचन केंद्रातून उल्हास नदीतून पाणी उचलले जाते आणि १५० द.ल.लि. पुरवठा नेतिवली जलशुध्दीकरण केंद्राद्वारे शुद्ध करून डोंबिवली पूर्व व पश्चिम विभागात वितरित केला जातो.

सदर उदंचन केंद्र व जलशुध्दीकरण केंद्रातील विद्युत आणि यांत्रिकी उपकरणांची नियोजित दुरुस्ती व देखभाल कामे करण्यासाठी मंगळवार दि. २४/०२/२०२६ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ९ तासासाठी जलशुध्दीकरण केंद्रातून होणारा पाणी पुरवठा तात्पुरता बंद राहणार आहे. यामुळे डोंबिवली पूर्व व पश्चिम विभागातील नागरिकांना पाणी उपलब्ध होणार नाही.महानगरपालिकेने नागरिकांना विनंती केली आहे की, शटडाऊन कालावधीत कोणत्याही गैरसोयीचा सामना होऊ नये म्हणून घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी पाण्याचा पुरेसा साठा करून ठेवावा. तसेच, पाण्याचा विवेकपूर्ण वापर करण्यासाठी सहकार्य करावे.




ठाणे ■ शनिवार
२१ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# दहावी, बारावी परीक्षेत गैरप्रकार नाही: महाजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कडक बंदोबस्त, भरारी पथकांची सतर्कता आणि प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी दहावीचा पहिला भाषेचा पेपर शांततेत पार पडला. मराठी, हिंदीसह सर्व माध्यमांच्या प्रथम भाषेच्या परीक्षेत कोणत्याही केंद्रावर अनुचित प्रकार घडला नाही. सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके आणि पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणत्याही विद्यार्थ्यांवर कारवाई करावी लागली नाही, असे शिक्षणाधिकारी देविदास महाजन यांनी सांगितले. जिल्ह्यातील ३२६ केंद्रांवर दहावीचे एकूण १ लाख १९ हजार १०७ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. त्यामध्ये ६२ हजार ७१ मुलगे, ५७ हजार ३५ मुली आणि एक तृतीयपंथी विद्यार्थ्याचा समावेश आहे. उल्हासनगर येथील तक्षशीला विद्यालय हे संवेदनशील केंद्र आहे.



# पर्यावरण तज्ज्ञांनी कृषी क्षेत्राकडेही लक्ष केंद्रित करण्याची गरज

## - राज्यपाल आचार्य देवव्रत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. २० :** कृषी क्षेत्रातील रसायनांच्या वाढत्या वापरामुळे शेती बरोबरच पर्यावरणाचीही मोठी हानी होत आहे. रासायनिक शेतीचे दुष्परिणाम घातक आहेत. त्यामुळे एकूणच पर्यावरण तर प्रदूषित होतच आहे, शिवाय गंभीर आजारांचे संकटही वाढत आहे. त्यामुळे पर्यावरण तज्ज्ञांनी जागतिक पर्यावरण रक्षणाचा विचार करताना कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही विचार करावा, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे पार पडलेल्या 'मुंबई क्लायमेट वीक'च्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्थी, प्रोजेक्ट मुंबईचे शिशिर जोशी, जलज दानी आणि पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.

'मुंबई क्लायमेट वीक'च्या तीन दिवसीय परिषदेच्या माध्यमातून हवामान बदलाच्या गंभीर प्रश्नावर देश-विदेशातील तज्ज्ञांनी चिंतन केल्याबद्दल राज्यपालांनी आयोजकांचे अभिनंदन केले. राज्यपाल श्री.देवव्रत म्हणाले की, भारतीय संस्कृती ही निसर्गपूजक आहे. प्राचीन शिक्षणपद्धतीत मुलांना निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण दिले जात होते. मात्र आधुनिक काळात भोगवादी प्रवृत्ती वाढल्याने पर्यावरणाचा ऱ्हास झाला. आहे. कोरोना काळातील लॉकडाऊनमध्ये माणूस घरात राहिल्याने नद्या स्वच्छ झाल्या, आकाश निर्मळ दिसू लागले. यावरून पर्यावरणाचा ऱ्हास होण्यात मानवी हस्तक्षेपच प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

राज्यपालांनी रासायनिक खतांचा अतिवापर, तसेच युरिया, डीएपी आणि कीटकनाशकांमुळे 'नायट्रस ऑक्साईड'सारख्या वायूंचा पर्यावरणावर होणारा घातक परिणाम अधोरेखित केला. या रसायनांचा अंश भूजल आणि अन्नसाखळीत जाऊन गंभीर आजार होतात. रासायनिक शेतीमुळे जमीन अनुपजाऊ होत आहे. नैसर्गिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता, सेंद्रिय कार्बन आणि भूजलसाठा वाढतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'राष्ट्रीय प्राकृतिक कृषि मिशन'च्या माध्यमातून नैसर्गिक शेतीला चालना दिल्याचे राज्यपाल श्री.देवव्रत यांनी सांगितले.

एका वृत्तत्राने केलेल्या पाहणीत 105 मातांच्या दुधात कीटकनाशकांचे अंश आढळल्याचे नमूद करून याकडे गंभीरतेने पाहण्याचे आवाहन राज्यपालांनी केले.

### पर्यावरण संरक्षणासाठी ठोस कृतीची गरज – मंत्री पंकजा मुंडे

**पर्यावरण संरक्षणासाठी ठोस आणि व्यापक पातळीवर कृती करण्याचे आवाहन करत पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, भूतकाळात विकास आणि पायाभूत सुविधांवर भर देताना पर्यावरणाकडे दुर्लक्ष झाले. त्याचे परिणाम आज संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. पर्यावरणाचा प्रश्न हा एका प्रदेशापुरता मर्यादित नसून तो जागतिक स्वरूपाचा आहे. त्यामुळे यावर उपाययोजना करताना जागतिक दृष्टीकोन आवश्यक आहे. आणि हवा हे पर्यावरणाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. औद्योगिकीकरण आणि वाढत्या पायाभूत सुविधांमुळे या तिन्ही घटकांवर ताण निर्माण झाला आहे. आर्थिकदृष्ट्या मागास देशांनी विकासासाठी पर्यावरणास हानी पोहोचवणाऱ्या उद्योगांना परवानगी दिली आणि आता त्याची किंमत मोजावी लागत असल्याचे मंत्री श्रीमती मुंडे यांनी नमूद केले. पर्यावरणविषयक परिषदांमधील चर्चा केवळ बौद्धिक पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे, अशी आशा व्यक्त करून, मुंबई क्लायमेट वीकमुळे विविध देशांतील तज्ज्ञांशी विचारविनिमयाची संधी मिळाल्याबद्दल श्रीमती मुंडे यांनी समाधान व्यक्त केले.**

# जागृती ठाकरे शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी :** ठाणे जिल्हा परिषद आयोजित विविध गुणदर्शन स्पर्धा प्राथमिक शिक्षण विभाग " द लोढा वर्ल्ड स्कूल पलावा सिटी डोंबिवली " येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेपैकी " शैक्षणिक साहित्य निर्मिती " या उपक्रमात भिवंडी तालुक्यातील जि.प.शाळा- अंबाडी मराठी,केंद्र- झिडके या शाळेतील शिक्षिका जागृती जगन्नाथ ठाकरे यांच्या इयत्ता-1ली ते पाचवी करिता उपयुक्त असे गणित विषयाचे शैक्षणिक साहित्य " चला करूया सराव गणिताचा." या शैक्षणिक साहित्य निर्मितीचा उद्देश- निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हे मूलभूत उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपयोग, गणित विषयाचा पाया पक्का होतो,गणित विषयाची गोडी निर्माण होते,खेळातून संकल्पना दृढीकरण होते,त्यामुळेच स्यंअध्ययनाची गोडी लागते,टाकाऊपासुन टिकाऊ साहित्य बनविल्यास अल्पखर्चिक आहे,टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होते,त्या मुळे सदर शैक्षणिक साहित्य हे बहुवर्ग अध्ययन- अध्यापनास



उपयुक्त तसेच हाताळण्यास सोयीस्कर असे आहे. अशा प्रकारच्या विविध संकल्पना स्पष्ट करणारे शैक्षणिक साहित्य निर्मिती केल्यामुळेच जागृती ठाकरे यांना प्रथम क्रमांकाचे जिल्हा पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांना हे पारितोषिक जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यानिमित्ताने कल्याण तालुका गटशिक्षणाधिकारी- सुनिता मोटघरे,शिक्षण विस्तार अधिकारी- आशिष झुंजारराव,जिल्हा समन्वयक भरत वेखंडे, वेतन अधीक्षक- संभाजी पवार आदि मान्यवर उपस्थित होते.

जागृती ठाकरे या उपक्रमशील शिक्षिका असल्यामुळेच,त्यांच्या सर्जनशील वृत्तीमुळे त्या आपल्या दैनंदिन शालेय जीवनात आपल्या विद्यार्थ्यांसोबत विविध स्वरूपातील उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा,चिकित्सक गुण जोपासून एकंदरीत शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढीसाठी नेहमीच प्रयत्न करीत असतात,त्यांच्या या सन्मानाप्रित्यर्थ त्यांचे सहकारी व आप्तेष्ट यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या विद्यार्थ्यांकडून माहुली किल्ला परिसर स्वच्छ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी(प्रशांत घोडविंदे) :** जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिवजयंती निमित्ताने दिनांक २० फेब्रुवारी रोजी ऐतिहासिक माहुली किल्ला येथे स्वच्छता मोहीम राबवून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले. या उपक्रमात ५० स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. किल्ल्याच्या परिसरातील प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या, कागद व इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच पर्यटकांना स्वच्छतेचे




महत्त्व समजावून सांगण्यात आले. NSS कार्यक्रम अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, “इतिहास जपणे आणि पर्यावरण संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.” विद्यार्थ्यांनीही अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी राहण्याचा निर्धार व्यक्त केला.या उपक्रमामुळे किल्ल्याचा परिसर स्वच्छ झाला असून पर्यावरण संरक्षणाचा सकारात्मक संदेश समाजात पोहोचला आहे. या उपक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल सोनावणे तसेच प्रा. मृणाल वाघमारे उपस्थित होते. सदर उपक्रम संस्थेचे अध्यक्ष मा.रविंद्र घोडविंदे सर यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)**

वासिंद जवळील दहागाव येथे ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुरुष अ गट व ब गट यांसाठी भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक 21 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी सहा वाजता करण्यात आले आहे. वासिंद जवळ असलेले दहागाव गाव म्हणजे कबड्डी क्षेत्रात अनेक वर्षापासून एक नाव कमावलेले गाव आहे अनेक वर्षापासून या गावांमध्ये कबड्डी स्पर्धांचे आयोजन केले जाते यावर्षी शनिवार दिनांक 21 फेब्रुवारी 20206 रोजी भव्य अशा जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा पुरुष अ व ब गटातील स्पर्धा संपन्न होणार असून या स्पर्धेचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे तसेच रविवार दिनांक 22 फेब्रुवारी 20206 रोजी ठाणे जिल्हा परिषद सदस्य देवेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ होणार आहे या उद्घाटन सोहळ्यासाठी शहापूर विधानसभेचे माजी आमदार पांडुरंग बरोरा, भाजपाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी व विविध पक्षांचे राजकीय पदाधिकारी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत तसेच बक्षीस वितरण सोहळ्यासाठी शहापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार दौलत दरोडा, भिवंडी पूर्वचे माजी आमदार रुपेश म्हात्रे,मारुती धिर्डे, उद्योजक अनिलजी मानिवडे, शिवाजी अधिकारी, वासिंदचे सरपंच राजेंद्र म्हसकर, भोलानाथ कंपनीचे मॅनेजर संजय शिरगावकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी या आयोजित केलेल्या भव्य अशा जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांसाठी जिल्ह्यातील कबड्डी संघाने आपला सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजक राजदीप जामदार, सुधीर देसले, मनोज मोरे, नकुल परटोले, अतुल देसले सह जय बजरंग क्रीडा मंडळ, शिव प्रेरणा क्रीडा मंडळ, दत्त सेवा मंडळ व आई गावदेवी मंडळ दहागाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# फांगुळगव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील साखरवाडीचे पाणी पिण्यायोग्य

## तपासणी अहवालातील निष्कर्ष, पाणीपुरवठा पुर्ववत, नागरिकांमध्ये समाधान!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण(प्रशांत घोडविंदे) :** नैसर्गिक सौदर्याने नटलेल्या माळशेजमधील मुरबाड तालुक्यातील फांगुळगव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील'साखरवाडी या ८००ते९००लोकवस्तीच्या गावास पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्त्रोत कोणीतरी अज्ञातानी विषारी औषधे टाकल्याने पाण्यातील सर्व मासे मृत्युमुखी होते, तात्काळ ग्रामपंचायतीने पाणी पुरवठा बंद करून ग्रामस्थांना टँकरने पाणी पुरवठा सुरू केला होता, शिवाय स्वतः ग्रामपंचायत अधिकारी बाळू कोकणे यांनी पाणी नमूने तपासणी करिता शहापूर येथील प्रयोग शाळेत पाठवले होते,



त्याचा रिपोर्ट नुकताच आला असून हे पाणी पिण्यायोग्य असल्याचे त्यात म्हटलं असून यामुळे गावात पाणी पुरवठा पुर्ववत करण्यात आला असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. मुरबाड तालुक्यातील शेवटची व माळशेज घाटात वसलेली फांगुळगव्हाण ग्रामपंचायत असून या अंतर्गत ज्या वाड्या, वसत्या आहेत, त्यापैकी साखरवाडी हे एक गाव असून यांना एक ते दिड किमी अंतरावर असलेल्या नदीत विहिरी खोदून तेथून पाणीपुरवठा केला जातो.गावातील शिपाईआंबो भला हे पाणी सोडण्यासाठी गेले असता.त्यांना पाण्यात मासे मरण पावलले दिसले त्यांनी लगेचच गावात ग्रामस्थांना कळविले ग्रामस्थ घटनास्थळी पोहचले,दोन दिवसापूर्वी रात्री ११ ते १२च्या दरम्यान कोणी अज्ञान इसमांनी पिण्याच्या पाण्यात विषारी औषध टाकले असावे असा संशय व्यक्त केला.हे औषध एवढे भयानक आहे कि, पिण्याच्या पाण्यात जेवढे मासे होते तेवढे मरण पावले आहेत.या मरण पावलेल्या माशां मुळे पाणी खूप खराब झाले आहे.पाण्यास उग्र, दुर्गंधी युक्त वास येत असल्याने पिण्या योग्य राहिले नाही..शिपाई आंबो भला यांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला होता.ग्रामपंचायतीने तात्काळ पाणी पुरवठा बंद करून गावास टँकरने पाणी पुरवठा सुरू केला होता, शिवाय या ठिकाणी तालुका वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच टोकावडे पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक, ग्रामपंचायत अधिकारी व कमिटी यांनी भेट देऊन पाणी नमुने तपासणीसाठी शहापूर येथील पाणी तपासणी प्रयोग शाळेत स्वतः बाळू कोकणे गेले होते. शिवाय या बाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान आज हा पाणी तपासणी अहवाल आला असून साखरवाडीचे पाणी पिण्यायोग्य असल्याचे त्यात म्हटलं आहे, त्यामुळे येते पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. याबाबत प्रयोगशाळेतील अधिका-यांना विचारले असता ते म्हणाले हा जैविक रिपोर्ट असून एकूण१५च्या आसपास तपासण्या केल्या जातात.हे काही जरी असले तरी सध्या गावावरचे संकट टळले असून यामुळे ग्रामपंचायत कमिटी, अधिकारी,ग्रामस्थ या सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे.

# अपघात प्रसंगात 108 रूग्ण वाहिकेचा वापर करा

## - प्रा.डॉ.जयपाल पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** बंजारा समाज कामगारांनी त्याचे गुरु संत सेवालाल जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात अलिबाग नगराध्यक्ष कु. नाईक ,उपनगराध्यक्ष अँड. मानसी म्हात्रे, माजी नगराध्यक्ष व नगरसेवक प्रशांत नाईक, रायगड भूषण प्रा. डॉ.जयपाल पाटील, अलिबाग पोलीस निरीक्षक श्री.साळी य आदी मान्यवर उपस्थित होते.

काम करीत असतांना अपघात झाल्यास बीव्हीजी कंपनीची 108रूग्ण वाहिकेला बोलवावी आणी ती मोफत असते असे सांगितले. यावेळेस बंजारा समाजानी प्रमुख मान्यवरांचे पुष्पगुच्छ व नारळ देऊन सन्मान केला.यानंतर अलिबाग-मुरुडचे



आमदार महेंद्र दळवी यांनी सदिच्छा भेट दिली व सेवालाल जयंती निमित्त शुभेच्छां दिल्या. यानंतर कामगार बंधु भगिनींना आपण कामगार दुत आहात,सर्व समाजाला आपली नितांत गरज असुन महिलांनो तुमच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस 112 क्रमांकावर संपर्क साधून सुरक्षित रहा.आज आपल्या येथे अलिबाग पोलीस ठाण्यातील निरीक्षक श्री. साळी आले असून त्यानी रक्तदान करून देश सेवा केली तसेच युवकांनी करावे आपल्याच पत्नीस बाळंतपणात गरज असल्यास ते जिल्हा रुग्णालयात मोफत मिळेल. आपल्या मुली आणी सुनांना बाळंतपणात महाराष्ट्र शासनाची 102 मोफत रूग्ण वाहिका घराजवळ येईल.यावेळेस 108चे जिल्हा प्रमुख श्री.अजय जगताप यांना संपर्क साधताच पेझारी येथुन डॉ.अंकिता लांडगे व पायलट श्री.सिध्दातं म्हात्रे हे 108घेउन आले.त्याचेही स्वागत समितीने केले.कार्यक्रमास अलिबाग नगरपरिषद चे सर्व नगरसेवक उपस्थित होते.आभार श्री.नामदेव पवार यांनी मानले तर सूत्रसंचालन श्री.प्रकाश राठोड यांनी केले.यानंतर सर्व जणास भोजन केले होते.त्याची जबाबदारी गोरख राठोड, शंकर जाधव, अनिल राठोड, चंदर पवार, शिवराम जाधव यांनी सांभाळली.

# राज्यस्तरीय अंतर-महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालयाचे यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे(प्रशांत घोडविंदे) :** जोशी बेडेकर महाविद्यालय ठाणे यांच्या वतीने “आजची पत्रकारिता लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ राहिली आहे का?” या विषयावर राज्यस्तरीय अंतर-महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेचे आज दिनांक २०/२/२०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथील बी.ए.एम.एम.सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी दिया झाटे आणि तेजस्विनी थोरात यांनी उत्कृष्ट युक्तिवाद सादर करत द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धेत राज्यभरातील विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. दिया आणि तेजस्विनी यांनी विषयाचे सखोल अध्ययन, प्रभावी मांडणी आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या या यशाबद्दल त्यांना ३००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, विभागप्रमुख डॉ. राहुल तौर तसेच प्रा. मोहन गारे व प्रा. निलेश कुंभार यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024